SHREEMATI NATHIBAI DAMODAR THACKERSEY
**WOMEN'S UNIVERSITY**
01, Nathibai Thackersey Road, Churchgate, Mumbai – 400 020
Telegram : UNIWOMEN Telephone : 22031879 Fax : 2201 8226
Website : www.sndt.ac.in

Estb/Gen-15/2018-19/2817

Dec.29, 2018

**URGENT & TOP PRIORITY**

To,

1) All the Principals of the colleges conducted by this University situated at Juhu, Churchgate and Pune.
2) All Director /Heads/Co-ordinators/Deputy Registrar/Assistant Registrar/In-Charge of the University Departments at Churchgate & Juhu Campuses.
3) Finance And Accounts Officer of the University,
4) SPP Unit
5) Establishment Section of the University, Churchgate

# CIRCULAR

**Sub : To Upgradation in pension pay**

Sir / Madam,

Vide Government Resolution No.न्यायप्र-२०१५/एसएलपी/प्र.क्र.५/सेवा-४ dated 27.12.2018 received from Deputy Secretary, Finance Department, Maharashtra Government, Mantralaya, Mumbai 400 032 and Circular No. कार्या-४-१/सेनिवे/३६९ dated 15.02.2109 received from Joint Director, Higher Education, Mumbai Region, Mumbai on the subject cited above which are self explanatory (copy enclosed) you are request to submit the proposals of retired employees, who were retired between the period from 1.1.2006 to 26.02.2009, for upgradation of pension pay as early as possible.

It may be noted that, to follow the above strictly, failing which the responsibility lies with the concerned Head of the Department.

Yours faithfully

दि गो देशपांडे
२६।२।१९

**(Dr. Deepak Deshpande)**
**Registrar**

Encl : As above.

महाराष्ट्र शासन
सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.
एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.
ई.मेल- jdhemumbai@gmail.com
दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६५६६००
web./www.jdhemumbai.maharashtra.gov.in

क. कार्या—४—१/सेनिवे/२०१९/ 361 दिनांक 21/1/2/2019

# परिपत्रक/तात्काळ

प्रति,
सर्व प्राचार्य, शासकीय, अशासकीय अनुदानित महाविद्यालय व संस्था,
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

विषय : निवृत्तीवेतनात सुधारणा करण्याबाबत
संदर्भ : शासन निर्णय क्र. न्यायाप्र-२०१५/एसएलपी/प्र.क्र.५/सेवा-४ दि. २७ डिसेंबर, २०१८

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयावाबत आपणास कळविण्यात येते की, संदर्भाधिन शासन निर्णयान्वये दिनांक १.१.२००६ ते दिनांक २६.०२.२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्तीवेतनात/कुटुंब निवृत्तीवेतनात सुधारणा करण्यावाबत शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. (संदर्भीय शासन निर्णयाचे अवलोकन करावे सदर शासन निर्णय सोबत जोडला आहे)

सदरहु शासन निर्णयान्वये दिनांक १.१.२००६ ते दिनांक २६.०२.२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्तीवेतनात/कुटुंब निवृत्तीवेतनात सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास तात्काळ सादर करावा, प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाल्यास आपण कार्यालय प्रमुख म्हणुन सर्वस्वी जबाबदार रहाल अथवा या बाबत कुठल्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास आपण व्यक्तीशः जबाबदार रहाल, याची नोंद घ्यावी.

सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.

दिनांक १.१.२००६ ते दिनांक २६.०२.२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतन धारकांच्या निवृत्तिवेतनात / कुटुंब निवृत्तिवेतनात सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक - न्यायाप्र-२०१५/एसएलपी/प्र क्र.५/सेवा-४

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- २७ डिसेंबर, २०१८

**संदर्भ-** १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सेनिवे १००९/प्र.क्र.३३/सेवा-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २००९

२) शासन शुद्धिपत्रक, वित्त विभाग क्रमांक सेनिवे १००९/प्र.क्र.३३/सेवा-४, दिनांक १५ डिसेंबर,२००९

प्रस्तावना-

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ वरील दिनांक ३० ऑक्टोबर २००९ च्या शासन निर्णयान्वये सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक १/१/२००६ नंतर निवृत्त होणाऱ्या निवृत्तिवेतन धारकांच्या निवृत्तिवेतनाबाबत सुधारणा करण्यात आल्या होत्या. मात्र सदर शासन निर्णयातील काही तरतुदी या दिनांक १.१.२००६ ऐवजी दिनांक २७.०२.२००९ पासून लागू करण्यात आल्या होत्या. या तरतुदी दिनांक १/१/२००६ पासून लागू कराव्यात यासाठी मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या रिट याचिका क्रमांक ८९८५/२०११ (श्रीमती सावित्रीबाई नरसय्या गुडप्पा विरुद्ध महाराष्ट्र शासन) व त्यासोबतच्या समान विषयावरील इतर याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक ३० ऑक्टोबर, २००९ च्या शासन निर्णयातील काही तरतूदीमध्ये सुधारणा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१. निवृत्तिवेतन -

दिनांक ३० ऑक्टोबर २००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ५.१, ५.२, ५.३ व ५.४ मधील तरतूदी दिनांक १.१.२००६ पासुन लागू राहतील. त्यानुसार दिनांक १.१.२००६ ते दिनांक २६.२.२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांना सुधारित निवृत्तिवेतनाचा लाभ अनुज्ञेय होईल.

२. थकबाकी -

१/१/२००६ ते २६/०२/२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्तिवेतन सुधारित केल्यानंतर अनुज्ञेय थकबाकीची रक्कम निवृत्तिवेतनधारकांना अदा करण्यात यावी.

३. <u>निवृत्ति उपदान/ मृत्यु उपदान:-</u>

निवृत्ति उपदान/मृत्यु उपदान यांच्या अनुषंगाने दिनांक ३० ऑक्टोबर, २००९ च्या शासन निर्णयात नमूद परिच्छेद क्रमांक ६ व ६.१ मधील तरतूदी पूर्वीप्रमाणेच कायम राहतील. तथापि या तरतूदी दिनांक ०१ जानेवारी २००६ पासून लागू करण्यात आल्यामुळे सेवानिवृत्तिवेतन धारकाच्या उपदानाच्या रक्कमांमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होत असल्यास त्याचे समायोजन देय निवृत्तिवेतन/ कुटूंबनिवृत्तिवेतनाच्या थकबाकीतून करण्यात यावे.

४. निवृत्तिवेतन सुधारित केल्यामुळे देय होणाऱ्या थकबाकीच्या रकमेवर व्याज अनुज्ञेय असणार नाही.

५. निवृत्तिवेतन सुधारित केल्यामुळे देय फरकाची रक्कम एकत्रितरित्या थकबाकीच्या स्वरुपात देण्यात येत असल्याने आता पुन्हा निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण अनुज्ञेय होणार नाही.

६. **वरीलप्रमाणे** निवृत्तिवेतनात सुधारणा केल्यामुळे देय होणा-या थकबाकीची रक्कम संबंधित निवृत्तिवेतन धारकांना/ कुटूंबनिवृत्तिवेतन धारकांना एकरक्कमी अदा करण्यात यावी.

७. <u>सर्वसाधारण सूचना:-</u>

<u>अ) शासन विभागांकरीता सूचना-</u>

शासनाच्या प्रत्येक विभागाने त्याच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुखांनी यांनी दिनांक ०१.०१.२००६ ते २६.०२.२००९ या कालावधीतील निवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनाची प्रकरणे सुधारित करुन याबाबत दर सहा महिन्यांनी आढावा घ्यावा. त्यांच्या अधिपत्याखालील एखाद्या कार्यालय प्रमुखांनी यांनी सुधारित निवृत्तिवेतन प्रकरण महालेखापाल कार्यालयास सादर न केल्यामूळे उद्भवलेल्या न्यायालयीन प्रकरणास तो विभाग सर्वस्वी जबाबदार राहील.

<u>ब) कार्यालय प्रमुख यांच्यासाठी सुचना-</u>

१. कार्यालय प्रमुख यांनी दिनांक ०१.०१.२००६ ते २६.०२.२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या सर्व शासकीय कर्मचारी यांच्या निवृत्तिवेतनाची प्रकरणे उपरोक्त प्रमाणे सुधारित करुन मा. महालेखापाल कार्यालयास सेवापुस्तकासह विहित नमूना क्र.६ मध्ये सुधारणेसाठी सादर करावीत. ज्या निवृत्तिवेतनधारकांच्या / कुटुंबनिवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनाचे अभिलेख उपलब्ध नसतील अशा प्रकरणी निवृत्तिवेतनधारकांनी/ कुटुंबनिवृत्तिवेतनधारकांनी संबंधित कार्यालय प्रमुखाकडे P.P.O. (निवृत्तिवेतन प्रदान आदेश) च्या प्रतीसह अर्ज करावा. कार्यालय प्रमुखाने अर्ज प्राप्त झाल्यानंतर योग्य ती शहानिशा करुन निवृत्तिवेतन प्रकरण सुधारणेकरीता मा.महालेखापाल कार्यालयास सादर करावे.

२. दिनांक ०१.०१.२००६ ते २६.०२.२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या सर्व शासकीय कर्मचारी यांच्या सुधारित निवृत्तिवेतनाची/ कुटुंबनिवृत्तिवेतनाची प्रकरणे तातडीने सादर करण्याची दक्षता घ्यावी. सुधारित निवृत्तिवेतन/ कुटुंबनिवृत्तिवेतन प्रकरणांबाबतचा अहवाल संबंधीत प्रशासकीय विभागास पाठविण्यात यावा.

क) अधिदान व लेखा अधिकारी/ कोषागार अधिकारी यांच्यासाठी सुचना-

१. काही सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारीत नियम लागु केल्यामुळे सेवा-नि-उपदानाची रक्कम कमी येत असल्या कारणाने अशा रकमेची वसूली देय निवृत्तिवेतनाच्या/ कुटुंबनिवृत्तिवेतनाच्या थकबाकीतून करण्यात यावी. **याकरिता सेवा-नि-उपदानाकरिता असलेले आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे प्राधिकार फक्त या कालावधीकरीता संबंधित कोषागार अधिकारी/ अधिदान व लेखा अधिकारी यांना देण्यात येत आहेत.**

२. कोषागार अधिकारी / अधिदान व लेखा अधिकारी यांच्या अभिलेखामध्ये ज्या निवृत्तिवेतनधारकांच्या / कुटुंबनिवृत्तिवेतनधारकांच्या निवृत्तिवेतनाचे अभिलेख उपलब्ध नसतील अशा निवृत्तिवेतनधारकांच्या/ कुटुंबनिवृत्तिवेतनधारकांच्या बाबतीत निवृत्तिवेतनधारकाच्या P.P.O. (निवृत्तिवेतन प्रदान आदेश) ची प्रत प्राप्त करुन घेऊन मा. महालेखापाल यांचेकडून योग्य ती शहानिशा करुन घेऊन निवृत्तिवेतनधारकास थकबाकी अदा करण्यात यावी.

३. कोषागार अधिकारी/ अधिदान व लेखा अधिकारी यांनी दिनांक ०१.०१.२००६ ते २६.०२.२००९ या कालावधीतील निवृत्तिवेतनधारकाच्या थकबाकी विषयक नोंदी स्वतंत्र Excel Sheet मध्ये नोंदवावी. खालीलप्रमाणे थकबाकी विषयक नोंदींचा लेखा ठेवण्यात यावा.

| Sr.no. | PPO No. | Name of Pensioner | Total Arrears Payable | Deduction If Any | Net amount Payable | Remarks if any |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

४. कोषागार अधिकारी/ अधिदान व लेखा अधिकारी यांनी दिनांक ०१.०१.२००६ ते २६.०२.२००९ या कालावधीतील निवृत्तिवेतनधारकाच्या थकबाकीवर नियमानुसार आयकर कपातीची कार्यवाही करावी.

५. कोषागार अधिकारी/ अधिदान व लेखा अधिकारी यांनी दिनांक ०१.०१.२००६ ते २६.०२.२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांकडून अतिप्रदान रक्कमेबाबतचे विहित नमुन्यातील हमीपत्र घ्यावे .

८. शासन असाही आदेश देत आहे की,ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यताप्राप्त अनुदानीत शैक्षणिक संस्था, कृषितेर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषी विद्यापीठे यामधील निवृत्तिवेतनधारक/ कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना वरील निर्णय योग्य त्या फेरफारासह लागू राहील.

९. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१(सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि

त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार याचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहतील.

१०. यासंबंधीचा खर्च वर नमूद निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन ज्या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतो त्या शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या शीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तथापि, आवश्यक असल्यास संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी वरील निवृत्तिवेतनधारकासंबंधिचा खर्च भागविण्यासाठी विधीमंडळाच्या येत्या अधिवेशनात पूरक मागणी सादर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

११. दिनांक ३० ऑक्टोबर २००९ च्या शासन निर्णयातील इतर तरतूदी पूर्वीप्रमाणेच कायम राहतील. तसेच या शासन निर्णयाच्या अनुषंगाने पारित करण्यात आलेल्या दिनांक १५ डिसेंबर, २००९ च्या शुद्धिपत्रकासोबतची परिशिष्टे दिनांक ०१/०१/२००६ नंतर सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांसाठी लागू रहातील.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८१२२७१७३२२७१००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anudeep
Shrinivas
Dighe

Digitally signed by Anudeep Shrinivas Dighe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=75f50c6671abf79e06e7d05c1f27cdae17ad6b947f5b0d740fa705320bede741, cn=Anudeep Shrinivas Dighe
Date: 2018.12.27 17:38:20 +05'30'

(अनुदीप दिघे)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्य मंत्र्यांचे सचिव,
३) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१००० प्रती),
६) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१००० प्रती),
७) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
८) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५प्रती),
९) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
१०) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),
११) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,(१० प्रती)
१२) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
१३) उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),

१४) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
१५) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
१६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
१७) *विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
१८) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा) मुंबई,
१९) *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
२०) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२१) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२२) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२३) *प्रबंधक, मुंबई महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण /नागपूर/औरंगाबाद
२४) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२५) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
२६) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
२७) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग,गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
२८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
२९) कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, 'संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेज समोर, पुणे ४११ ०३०
३०) कार्यवाह, बृहन्मुंबई पेन्शनर्स असोसिएशन, वर्ग क्र२१., तळ मजला, छबिलदास हायस्कूल, वनमाळी हॉलसमोर, दादर (प), मुंबई.०२८ ४००-
३१) अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट पेंशनर्स असोसिएशन बेळगाव, १०९१, अनंतशयन गल्ली, लक्ष्मी निवास, दुसरा मजला, बेळगांव.
३२) मंत्रालयातील सर्व विभाग,
३३) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
३४) सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
३५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
३६) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
३७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
३८) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
३९) तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
४०) सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
४१) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
४२) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
४३) सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती)

४४) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
४५) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
४६) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
४७) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
४८) कुल सचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (१० प्रती),
४९) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, जिल्हा रायगड (१० प्रती),
५०) कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (५ प्रती),
५१) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १ (५ प्रती)
५२) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २० (५ प्रती)
५३) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,, मुंबई ४ (५ प्रती)
५४) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३ (५प्रती )
५५) इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती)
५६) नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१ (५ प्रती)
५७) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८ (५ प्रती)
५८) वित्त विभागातील सर्व कार्यासने,
५९) निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.
*पत्राद्वारे.